# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ / फाल्गुन ९, १९४४ ( शके )**

## मुख्यमंत्री :- यांचे प्रभारी विभाग

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४२**

---

### मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यात नालाखोलीकरण व बांधदुरुस्तीच्या कामांना मंजूरीसह निधी मिळणेबाबत

**(१) * ५७८२६ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी (जि.अमरावती) तालुक्यात दिनांक ५ व ६ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे पातुर ते विचोरी, पातुर ते आडगांव, काटसुर, पोरगांव, अडगांव ते मंगरुळ रोहणखेडा, ब्राम्हणवाडा भगत, शिराळा ते थावली या गावांमध्ये पुराचे पाणी शिरल्यामुळे नागरिकांचे व शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुढे पावसाचे पाणी गावांमध्ये शिरु नये यासाठी नालाखोलीकरण व बांधदुरुस्ती करणे आवश्यक असून त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे दिनांक ७ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नालाखोलीकरण व बांधदुरुस्तीच्या कामांना मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) ब्राम्हणवाडा भगत, शिराळा व यावली येथील खोलीकरण तसेच बांधदुरुस्तीच्या कामास जिल्हा नियोजन समिति, अमरावती यांनी प्रशासकीय मान्यता दिली असून सद्यस्थितीत हे कामे प्रगतीपथावर आहे.

उर्वरित कामे जलयुक्त शिवार अभियान २.० मध्ये घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील भिडेवाडा येथे सावित्रीबाई फुले यांचे**
**स्मारक उभारण्याबाबत**

**(२) * ५६५२८ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भिडेवाडा या ऐतिहासिक वास्तूच्या भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिडेवाडा ही ऐतिहासिक वास्तू राष्ट्रीय स्मारक करण्यासाठी दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ व २० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास भिडेवाड्यासमोर ज्येष्ठ समाज सेवक श्री.बाबा आढाव व सामाजिक संघटनांनी आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भिडेवाडा ही वास्तू ताब्यात घेवून या ठिकाणी “सावित्रीबाई फुले आद्य मुलींची शाळा” सुरु करून राष्ट्रीय दर्जाचे स्मारक करण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये हे काम हाती घेण्याचा निर्णय दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत कार्यवाही करुन भिडेवाडा या ऐतिहासिक वास्तूच्या ठिकाणी राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक २१.१२.२०२२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी भिडेवाडा येथे स्मारक करण्याबाबत मिळकतीचे मालक/विकासक/भाडेकरू यांच्या समवेत बैठक घेवून त्यांच्या पुनर्वसनासह स्मारकाचा आराखडा तयार करून शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे व आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना निदेश दिलेले आहेत.

भिडेवाडा वास्तु प्रकरणी आयुक्त, पुणे महानगरपालिका, जिल्हाधिकारी, पुणे व भिडेवाडा मिळकतीचे मालक, विकासक व भाडेकरू (निवासी व व्यवसायिक) यांच्यामध्ये बैठका घेण्यात आलेल्या असून तोडगा काढण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

भिडेवाडा या मिळकतीच्या भूसंपादनाची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून सुरू असून न्यायालयीन दाव्यांमुळे सदरचे भूसंपादन प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील शारदा मंदिर कन्या शाळेत अनुसूचित जाती–जमातीच्या मुलींकडून शाळा प्रवेशाच्या वेळी प्रवेश शुल्क वसूल केल्याबाबत

**(३) * ५६७५५ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शारदा मंदिर कन्या शाळेत अनुसूचित जाती–जमातीच्या मुलींकडून सन २०२२ -२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश शुल्क वसूल केल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अशा प्रकारे बेकायदेशीरपणे वसूल केलेले प्रवेश शुल्क मुलींना परत करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अनुसूचित जाती-जमाती आयोगानेदेखील अनुदानित शाळांकडून अशा प्रकारे बेकायदेशीरपणे वसूल केलेले प्रवेश शुल्क परत करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असे आदेश देऊनही शारदा मंदिर कन्या शाळेच्या मुख्याध्यापिकेने / संस्थेने मागासवर्गीय मुलींचे वसूल केलेले शुल्क परत केले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन प्रवेश शुल्क परत करुन अनुसूचित जाती–जमातीच्या मुलींचे आर्थिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी मुख्याध्यापिका व संस्थेचे अध्यक्ष यांच्याविरुद्ध अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९ कलम ३ अंतर्गत गुन्हा नोंदविण्याची कारवाई करण्यात आली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील कामवरी नदीवर जलपर्णीची वाढ झाल्याने जलप्रदूषणात झालेली वाढ

**(४) * ५८८३१ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील कामवरी नदीवर जलपर्णीचा विळखा पडल्याने मोठ्या प्रमाणावर जलप्रदूषण वाढल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीच्या पात्रात परिसरातील लोकवस्तीमधून सांडपाणी सोडले जात असल्याने व झालेल्या अनधिकृत बांधकामामुळे गेल्या काही महिन्यापासून जलप्रदूषणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त जल प्रदूषणांकडे संबंधित प्रशासकीय विभाग दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामवरी नदीचे जलप्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कामवरी नदीचे जल प्रदुषण रोखण्यासाठी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेला वेळोवेळी सुचना व आदेश देण्यात आलेले आहेत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतून निर्माण होणारे घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया कामवरी नदीमध्ये मिसळले जात असल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्याविरुद्ध दिनांक २३/०९/२०२२ रोजी खटला (क्र. ११३३/२०२२) दाखल करण्यात आला आहे.

कामवरी नदीतील जलपर्णी काढण्याबाबत व वाढ रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सुचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कोरोनाच्या काळात कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या स्पर्धा परिक्षा उमेदवारांना वयोमर्यादेचा कालावधी वाढवून देण्याबाबत

**(५) * ५७२२० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाच्या काळात वयोमर्यादा ओलांडलेल्या स्पर्धा परिक्षा देणाऱ्या उमेदवारांना वयोमर्यादेतील सवलतींचा कालावधी वाढवून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या काळात शासकीय सेवेत सरळसेवेने नियुक्ती देण्यासंदर्भात जाहिराती प्रसिध्द न झाल्यामुळे अनेक उमेदवारांची कमाल वयोमर्यादा ओलांडली गेल्यामुळे स्पर्धा परिक्षेस बसण्याची त्यांची संधी हुकली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, कोरोनाच्या काळात कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या राज्यातील स्पर्धा परिक्षा देणाऱ्या उमेदवारांना सरळसेवा परिक्षेस बसण्याची संधी मिळण्यासाठी वयोमर्यादेतील सवलतीचा कालावधी वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) नाही,

कोरोना कालावधीत पदभरतीच्या जाहिराती प्रसिध्द न झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दि.१७.१२.२०२१ च्या शासन निर्णयाव्दारे वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना परिक्षेला बसण्याची संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने विशेष बाब म्हणून दि.१७.१२.२०२१ ते दि.३१.१२.२०२२ या कालावधीत प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातींच्या अनुषंगाने परिक्षेला बसण्याची मुभा दिली होती.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार जानेवारी, २०२२ पासून डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून ११९४५ इतक्या पदांकरिता १२८ जाहिराती देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सन २०१६ पासून दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींच्या सरासरी संख्येच्या तुलनेत ही संख्या दुपटीहून अधिक आहे.

जानेवारी, २०२२ ते डिसेंबर, २०२२ अखेरपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सदर जाहिरातींच्या अनुषंगाने होणाऱ्या परीक्षांना बसण्याची अतिरिक्त संधी कोविड कालावधीत वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना दि.१७.१२.२०२१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार उपलब्ध झाली आहे.

सबब कोविड कालावधीत कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांची स्पर्धा परीक्षांना बसण्याची संधी हुकली आहे, अशी वस्तुस्थिती नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दाभले (ता.डहाणू, जि. पालघर) येथील रेडिमिक्स काँक्रीटच्या प्रकल्पाबाबत**

**(६) * ५८८६९ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील वाणगाव-चारोटी मार्गावरील दाभले गावच्या हद्दीतील गट क्र.१४५/८ आणि १५७/२ मधील ८ हेक्टर जागेवर प्रिमीयम इन्फ्रा सर्विसेस प्रा. लि. या कंपनीकडून उभारण्यात आलेल्या रेडिमिक्स काँक्रीट प्लांटची मुदत संपून देखील अद्यापही सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्लांटसाठी दाभले ग्रामपंचायतीने दिनांक २५ जून, २०२० रोजी दोन वर्षांसाठी दिलेल्या ना-हरकत परवानगीची मुदत दिनांक २५ जून, २०२२ रोजी संपलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डहाणू परिसर हा पर्यावरणाच्या दृष्टीने अतिसंवेदनशील म्हणून घोषित केला असून तेथील पर्यावरणाला व शेतीला नुकसान पोहचू नये यासाठी अशा प्रदुषणकारी प्लांटला परवानगी देऊ नयेत अशी मागणी समाजसेवी संस्था व स्थानिक बागायतदारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

मे. प्रिमीयम इन्फ्रा सर्विसेस प्रा. लि. या आरएमसी प्लांटला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे दि.१२.११.२०२० रोजी प्रदान करण्यात आलेले संमतीपत्र दि. ३१.०८.२०२३ पर्यंत वैध आहे. तसेच ग्रामपंचायत दाभले यांनी दिलेल्या ना हरकत दाखल्यामध्ये कोणतीही मुदतीचा उल्लेख नसल्याचे दिसून येते.

(३) हे खरे नाही.

सदरील आरएमसी प्लांटच्या विरोधात कोणतीही तक्रार किंवा परवानगी न देण्याबाबत मागणी समाजसेवी संस्था व स्थानिक बागायतदारांकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धुळे महानगरपालिकेतील सर्व शाळा सुरु करण्याबाबत**

**(७) * ५६७९४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे**

**(मुरबाड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महानगरपालिकेच्या ५९ शाळांपैकी केवळ २० शाळा सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शासनाच्या शाळा बंद झाल्याने जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना खाजगी व विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या २० शाळांपैकी १२ उर्दू व केवळ ८ मराठी माध्यमाच्या शाळा सुरू असून, या शाळांमध्ये आवश्यक शिक्षक, शैक्षणिक साहित्य तसेच इतर मुलभूत सुविधा यांचा अभाव असून शाळेच्या इमारतीदेखील कमकुवत झाल्याने विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व शाळा तातडीने सुरु करुन इमारतींची दुरुस्तीसह या शाळांमध्ये शिक्षक, शालेय साहित्य व इतर मूलभूत सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२), (३) व (४) सन १९९० पूर्वी धुळे महानगरपालिकेच्या ५९ शाळा सुरु होत्या.

- शासनाने खाजगी शाळांना परवानगी दिल्याने धुळे शहरात मोठ्या प्रमाणात खाजगी शाळा सुरु झाल्या.
- त्यानंतर सन २००७-०८ मध्ये महानगरपालिकेच्या २६ शाळा कार्यरत होत्या.
- पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे कल वाढल्याने व महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी असल्यामुळे भौतिक व शैक्षणिक सुविधांअभावी विद्यार्थी संख्या कमी होत गेली. त्यामुळे महानगरपालिकेच्या शाळांचे टप्प्या-टप्प्याने जवळच्या शाळांत समायोजन करण्यात आले.
- त्यामुळे आज अखेर महानगरपालिकेच्या २० शाळा सुरु आहेत.
- महानगरपालिकेच्या शाळांमध्ये नियुक्त केलेले शिक्षक हे आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारक आहेत. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा कमी नाही.
- महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत पाठ्यपुस्तके पुरविले जातात.
- तसेच, अनुसुचित जाती/जमातीचे विद्यार्थी व सर्व विद्यार्थीनींना शासनाकडून मोफत गणवेश पुरवठा केला जातो.
- महानगरपालिकेच्या काही शाळांमध्ये लोक सहभागातून डिजीटल सुविधाही पुरविण्यात आलेल्या आहेत.
- महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ मधील अंदाजपत्रकात शाळा दुरुस्ती व शाळा विकास याबाबत तरतूद करण्यात येत असून, यामुळे शाळेच्या इमारती व भौतिक बाबींवर अधिक लक्ष देण्याचा प्रयत्न महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महालक्ष्मी (मुंबई) येथे असलेल्या रेसकोर्सचा करार संपला असताना जागेचा वापर करीत असल्याबाबत

**(८) * ५६५१६ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय**

**सावकारे (भुसावळ), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महालक्ष्मी येथील भूखंड रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. या संस्थेला रेसकोर्ससाठी ९९ वर्षाच्या लिजवर दिलेला असताना त्याची सन २०१३ मध्ये मुदत संपूनही अद्याप कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेडकडून उक्त भूखंडाच्या भाड्याचे ५ कोटी ९९ लाख रुपये थकीत आहेत. तसेच रेसकोर्स सारखेच मुंबईतील सुमारे ४ हजार भूखंड भाडेपट्टा करार संपून देखील भूखंडांचा ताबा महानगरपालिकेने अद्याप घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रेसकोर्स वरील एकुण ८ लाख ५५ हजार १९८ चौ.मीटर जागेपैकी २ लाख ५८ हजार २४५ चौ.मीटरची जागा महानगरपालिकेच्या मालकीची तर ५ लाख ९६ हजार ९५३ चौ.मी. जागा ही राज्य शासनाची आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महालक्ष्मी रेसकोर्सचा भाडे करार १० वर्षापुर्वी संपुष्टात आल्यानंतर व नविन भाडे करार वेळेत न केल्याने महानगरपालिकेचा व राज्याचा मोठया प्रमाणात महसूल बुडाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महालक्ष्मी येथील रेसकोर्सवर थीमपार्क उभारण्यात येणार असून रेसकोर्स मुलुंड डम्पिंग ग्राउंड येथे हलविण्यात येणार आहे, याबाबत महानगरपालिकेने कोणती योजना आखली आहे व हा प्रकल्प कधीपर्यंत कार्यान्वित होणार आहे,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाचा महसूल बुडण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच रेसकोर्सकडून थकीत भाड्याची वसूली करुन या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे थीम पार्क बांधण्यासंदर्भात महानगरपालिका तथा शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या "अनुसूची डब्ल्यू" मध्ये नमूद केलेल्या मालमत्तांच्या भुभागांचे नुतनीकरण करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव दि.२७.०९.२०१६ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत विचारात घेण्यात आला होता. त्यानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ९१ ब मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. तद्नंतर "अनुसूची डब्ल्यू" मधील मालमत्तांच्या भुभागांचे नुतनीकरण करण्याबाबत दिनांक १५.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये भाडेपट्टा नुतनीकरणाचे धोरण जाहीर करण्यात आले आहे. तथापि, सदर धोरण करतांना महालक्ष्मी रेसकोर्स, विविध जिमखाने व तत्सम भुभागांबाबत आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार, महालक्ष्मी रेसकोर्स, विविध जिमखाने व तत्सम भुभागांबाबत पुढील कार्यवाही सुरु असून, सदरील भुभागांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे.

(२) महालक्ष्मी रेसकोर्ससारखेच भाडेपट्टा करार संपुष्टात आलेल्या एकूण ३२३ भूभागांपैकी ८९ भूभागांच्या मक्ता कालावधीचे नुतनीकरण करण्यात आले असून, उर्वरीत भुभागांच्या मक्ता नुतनीकरण बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) महालक्ष्मी रेसकोर्स, विविध जिमखाने व तत्सम भुभागांचे नुतनीकरण करण्यासाठी पुढील धोरण अस्तित्वात येईपर्यंत महसूल वसुलीच्या अनुषंगाने नगर विकास विभागाच्या दिनांक ०७.०६.२००७ च्या शासन आदेशान्वये, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत भाडे तत्वावर दिलेल्या "अनुसूची डब्ल्यु" मध्ये विर्निदिष्ट केलेल्या मालमत्तांची थकीत रकमांची वसुली जुन्याच दराने करण्यात यावी व फरकाची रक्कम व्याजासह भरण्यात येईल,

असे हमीपत्र संबंधितांकडून प्राप्त करुन थकीत रकमांची वसुली करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, दिनांक २८.०३.२०१४, दिनांक २८.०९.२०२२ व दिनांक २१.१०.२०२२ च्या पत्रान्वये महालक्ष्मी रेसकोर्स व तत्सम भूभागांची थकीत रकमेची वसुली संबंधितांकडून वसुल करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला पुन्हा सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यानुसार, मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि., महालक्ष्मी रेसकोर्स यांचेकडून करावयाच्या भाडे वसुलीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये हमीपत्र सादर करणेबाबत मे.रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि., महालक्ष्मी रेसकोर्स यांना कळविले असून याअनुषंगाने पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरु आहे.

(५) महालक्ष्मी रेसकोर्स मुलुंड डम्पिंग ग्राउंड येथे हलविण्याबाबत कोणताही प्रस्ताव महानगरपालिकेने कार्यान्वीत केलेला नाही.

(६) महालक्ष्मी रेसकोर्स येथील भूभागाच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे. तसेच, भूभाडे वसुलीबाबत मे. रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि., यांना हमीपत्राचा मसुदा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आला असून याबाबतची पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुरु आहे.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) शहरातील कचऱ्याच्या समस्येने नागरिक त्रस्त असल्याबाबत**

**(९) * ५९७७४ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील कचरा निर्मूलनाकरिता दरवर्षी करोडो रुपयांचा निधी दिला जात असूनही व सदरहू काम कंत्राटी पध्दतीने दिले जात असतांनाही शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पसरल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरालगत सोयगाव तसेच सोयगांव टेहेरे चौफुली ते डी.के चौकादरम्यानच्या मुख्य रस्त्यांवर अनेक ठिकाणी हजारो टन प्लॉस्टिक कचरा पडून असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे परिसरात सर्वत्र रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला असून नागरिक व जनावरांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कचऱ्याची योग्यरित्या विल्हेवाट लावण्याबाबत तसेच जबाबदार कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मालेगाव शहरातील कचरा निर्मुलनाकरिता कंत्राटी पध्दतीने काम देण्यात आलेले असून, कंत्राटदारामार्फत दैनंदिन कचरा संकलन करण्यात येत असते.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर परिसरात नियमितपणे कचरा संकलन करण्यात येत असून, सदर परिसरात आठ दिवसांतून दोन वेळेस धुराळणी जंतुनाशक फवारणी करण्यात येत असते. त्यामुळे रोगराई पसरण्याचा धोका कमी होऊन नागरिक व जनावरांच्या जीविताचे रक्षण होण्यास मदत होते.

(४) याबाबत महानगरपालिकेस नागरिकांकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यात येत असल्याने, कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, असे मालेगांव महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील झोपडपट्ट्यांचा विकास करण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याबाबत

**(१०) * ५६७७७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.विनोद निकोले (डहाणू), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील झोपडपट्टी भागाचा पुनर्विकास करण्यासाठी व नागरीकांना हक्काचे घर मिळावे यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याचा तसेच क्लस्टर योजनाही राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी क्लस्टर योजनेची ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने कोपरी, ठाणे शहर, वागळे इस्टेट, लोकमान्य नगर, वर्तकनगर या भागातील सुमारे १६ झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रकल्प प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा परिसर क्लस्टर योजनेत येत असल्यास त्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत नसल्याने संबंधित नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त परिसरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये क्लस्टरच्या धर्तीवर समानता आणावी, ठाणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील प्रलंबित प्रकल्प पूर्ण करावेत व झोडपपट्टीधारकांना न्याय द्यावा यासाठी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ ऑक्टोबर, २०२२ व ११ जानेवारी, २०२३ तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच ठाणे शहरात क्लस्टर योजनेंतर्गत ४४ आराखडे तयार केले असून या आराखड्याबाहेरील अतिधोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाला या क्लस्टर योजनेचा अडसर येत असल्याने ४० ते ५० वर्षापुर्वीच्या अतिधोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी मिनी क्लस्टर योजना जाहीर करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी तसेच वेळोवेळी मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने त्वरित चौकशी करुन क्लस्टर योजनेत समाविष्ट असलेल्या भागामध्ये झोपडपट्टीवासीयांना हक्काची घरे मिळण्याबाबत तसेच अतिधोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी मिनी क्लस्टर योजना जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) ठाणे शहराकरीता शासनाने दि.०२.१२.२०२० च्या अधिसुचनेन्वये मंजूर केलेली एकत्रिकृत विकास नियोजन व प्रोत्साहन नियमावली लागू असून, विनियम १४.७ हा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात व विनियम १४.८ हा नागरी पुनरूत्थान योजनेसंदर्भात आहे. सदर विनियम १४.८ मधील तरतुदीनुसार ठाणे महानगरपालिकेने एकुण ४५ नागरी पुररूत्थान आराखडे यांचे क्षेत्र व हद्दी अधिसुचित केले आहेत. विनियमामधील तरतुदीनूसार नागरी पुनरूत्थान योजनेमध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, clearance व

पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ४ अन्वये घोषीत झोपडपट्टी किंवा सार्वजनिक भूखंडावरील दि.०१.०१.१९९५ पुर्वीची झोपडपट्टी किंवा शासनाने इतर दिनांकास अधिसुचित केलेले क्षेत्र, एकुण क्लस्टर क्षेत्राच्या २५% पर्यंत अंतर्भूत करता येते. सदर विनियमाच्या खंड १४.८.१.(iii)(g) मध्ये सुधारणा करण्याअनुषंगाने शासनाने कलम ३७(१कक) ची सुचना दि.२७.०६.२०२२ रोजी निर्गमित केली असुन, सदरची सुधारणा तत्काळ प्रभावाने लागू करण्याकरिता कलम १५४ चे निदेश दि.२७.०६.२०२२ रोजी देण्यात आले आहेत. सदर बदलामुळे सुमारे १६ झोपडपट्टी पुनर्वसन योजना बाधीत होत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(३) ठाण्यातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये क्लस्टरच्या धर्तीवर समानता आणण्याबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी दि.१९.१०.२०२२ च्या पत्रान्वये दिले आहे. तसेच शासनाकडील दि.२७.०६.२०२२ रोजीच्या सुचनेच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधी यांनी दि.१५.१२.२०२२ च्या पत्रान्वये निवेदन दिले आहे.

(४) अशा स्वरूपाचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी दि.०९.०१.२०२३ रोजी दिले आहे.

(५) शासनाने दि.२७.०६.२०२२ रोजी निर्गमित केलेल्या सुचनेवर नियुक्ती अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाला असून त्यावर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर सदरचे प्राप्त अहवाल व अभिप्राय तसेच प्राप्त निवेदन विचारात घेऊन विनियम १४.८.१ (iii)(g) संदर्भात उचित अंतिम निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रस्त्याच्या कामाचे ठेके कंत्राटदारांना देऊन त्यांना अतिरिक्त फायदा करून दिल्याबाबत

**(११) * ५७९४५ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून रस्त्यांच्या कामाचे ठेके कंत्राटदारांना दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभियांत्रिकी विभागाने केलेल्या अभिलेख्यांच्या तपासणीत माहे जानेवारी ते मार्च, २०२१ या कालावधीत ज्या १७ कंत्राटदारांना रस्त्याच्या कामाचे ठेके दिले होते त्यापैकी प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी २ ठेकेदारांना ठेके देऊन त्यांना रु.४ कोटी ३६ लाखांचा अतिरिक्त फायदा करून दिला असल्याबाबतचे स्पष्टीकरण शासनाने दिलेले नसल्याचे `भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक' यांच्या माहे मार्च, २०२१ या दरम्यानच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाच्या अनुपालन अहवाल विधीमंडळास सादर केला आहे. सदर अहवालातील परिच्छेद क्र २.४ मध्ये कंत्राटदाराना रु ४ कोटी ३६ लक्ष इतका आदेय फायदा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून झाला असल्याचा परिच्छेद उपस्थित केला आहे. महालेखापरिक्षक कार्यालयाने सदर उपस्थित परिच्छेदासंबंधी

प्राधिकरणाच्या कार्यालयात तपासणी केले असता ही बाब प्राधिकरणाच्या निर्देशनास आणून दिली होती. त्यानुसार प्राधिकरणामार्फत कंत्राटदाराच्या उर्वरित देयकातून रु. ४.३६ कोटी एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. सबब कत्रांटदाराना अदेय फायदा प्राधिकरणामार्फत होऊ दिलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पिंपरी (जि.पुणे) शहरातील विद्यार्थ्यांना मोफत बस सेवा पुरविण्याबाबत**

**(१२)** * **५८३२१ श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी (जि.पुणे) शहरात महानगरपालिकेच्या शाळेमधील विद्यार्थ्यांना मागील सहा महिन्यांपासून मोफत बस सेवा मिळत नसल्याने शाळेतील विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने आतापर्यंत किती मोफत सेवा पुरविण्यात आल्या आहेत, नसल्यास, अंतिम निर्णय होऊन प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना मोफत बस सेवा पुरविण्याबाबत शासनाने अथवा महानगरपालिकेमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महानगरपालिकेतील शाळेतील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या मोफत बससेवा सुरू करण्याबाबत लोकप्रतिनिंधीनी शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना दिनांक ०६.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.
(२) व (३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील चोविसवाडी, चऱ्होली व वडमुखवाडी या भागातील, वीट भट्टी कामगारांच्या मुलांची वाहतुकीची गैरसोय होत असल्याने, अनेक विद्यार्थी शाळेत येऊ शकत नसल्याने तसेच त्यांचे पालक मोलमजुरी करून उदरनिर्वाह करत असल्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता सदर भागातील महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सन २०१२-१३ पासून सन २०१९ पर्यंत मोफत बस सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती.

मार्च २०२० मध्ये संपूर्ण देशामध्ये कोरोना संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने मार्च २०२० पासून सर्वत्र लॉकडाऊन लागल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळा बंद होत्या. त्यामुळे कोरोना कालावधीपासून आजतागायत या मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

सदर भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या बस सेवा दोन वर्ष कालावधीकरीता उपलब्ध करून देण्याबाबत शिक्षण विभागाने महानगरपालिकेतील वाहन दुरूस्ती कार्यशाळा विभागाकडे दिनांक ०९.०७.२०२२ अन्वये मागणी केलेली आहे.

त्यास अनुसरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शालेय विद्यार्थ्यांना मोफत बससेवा पुरविण्याच्या अनुषंगाने तसेच विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित, खात्रीशीर व आरामदायी होण्याच्या दृष्टीने पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे महानगरपालिकेमार्फत विचारणा करण्यात आलेली असून महामंडळाने बस सुविधा पुरविण्यास सहमती दर्शविलेली आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळ यांनी दि.०५.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविलेल्या दरानुसार वाहने उपलब्ध करून घेण्याबाबतची प्रक्रीया पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील दिव्यांग तसेच निराधारांना शासनाकडून दरमहा मिळत असलेल्या आर्थिक अर्थसहाय्यामध्ये वाढ करण्याबाबत**

**(१३) * ५७२१२ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य व केंद्र शासनातर्फे समाजातील दिव्यांग, वृध्द, निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, गंभीर आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा, घटस्फोट झालेल्या, पोटगी न मिळालेल्या, वेश्या व्यवसायातून मुक्त महिला, तृतीयपंथी, देवदासी, अविवाहित स्त्री, शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी तसेच सिकलसेलग्रस्त इ. अनेकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेतंर्गत अर्थसहाय्य (मानधन) दिले जात असून ५३ हजार लाभार्थी या योजनेचा लाभ घेत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दरमहा केवळ १०००/- रुपये आणि दोन अपत्ये असलेल्या व्यक्तींना दरमहा १२००/- रुपये आर्थिक सहाय्य शासनाकडून देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महागाईच्या काळात या योजनेंतर्गत मिळणारी आर्थिक मदत अत्यंत तुटपुंजी असून अनेक ठिकाणी ती वेळेवरही मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सद्य:स्थितीत मिळणाऱ्या अनुदानाच्या रकमेत भरीव वाढ करण्याची मागणी सर्व स्तरावरुन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दरमहा मिळत असलेल्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राज्यात संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे १४,१८,७९७ लाभार्थी तर श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेचे २६,८०,४४३ लाभार्थी असे एकूण ४०,९९,२४० इतके लाभार्थी आहेत.
(२) हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात दरमहा रु.६००/- वरुन रु.१०००/- तसेच सदर योजनेतील १ अपत्य असलेल्या विधवांना रु.११००/- तर २ अपत्य असलेल्या विधवांना रु. १२००/- इतकी वाढ विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

सदर योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण विहित कालावधीत नियमितपणे करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, कार्यालयांना दिलेल्या आहेत.

-----------------

## मुंबईतील डिलाईलरोड परिसरातील एसटीच्या बसस्थानकावरुन होणारी खाजगी ट्रव्हल्सची वाहतुक बंद करण्याबाबत

**(१४) * ५६५७४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील शहर आणि उपनगरातील प्रवाशांच्या सोयीसाठी एसटी महामंडळाने बस स्थानक सुरु केले मात्र काही स्थानकावरील गाड्या महामंडळाने बंद केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, डिलाईलरोड परिसरात राजर्षी शाहू महाराज एसटी बसस्थानकावरील गाड्या महामंडळाने गत चार वर्षांपासून बंद केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एसटीच्या अधिकृत बसस्थानकावरुन खाजगी ट्रॅव्हल्सच्या गाडयांची सर्रासपणे वाहतूक सुरु असून प्रवाशांना अधिकचे पैसे मोजून प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांच्या सोयीसाठी एसटी बस स्थानकावरील खाजगी वाहतूक बंद करुन एसटीच्या गाडया तातडीने सुरु करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) व (५) परळ येथील उड्डाणपुलाचे काम पुलाचे काम सुरु असल्याने फे-यांचा मार्ग बदल करुन फे-या चालनात आहेत. डिलाईल रोडवरील थांब्याचे व मार्गाचे सर्वेक्षण करण्यात येत असुन लवकरच सदर थांब्यावरुन वाहतूक पुर्ववत सुरू करण्यात येणार आहे. तसेच अवैध खाजगी वाहतुक बंद करण्याबाबत परिवहन आयुक्त, मुंबई व सह पोलीस आयुक्त वाहतुक, मुंबई यांना कळविण्याच्या सूचना राज्य परिवहन महामंडळास देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाच्या निविदेबाबत

**(१५) * ५८९०८ श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शहर आणि पूर्व व पश्चिम उपनगरातील रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यासाठी निविदा मागवून एक महिन्याचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर देखील या कामांसाठी कंत्राटदार निश्चित करण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निविदा प्रक्रियेला ९ कंत्राटदारांनी प्रतिसाद देऊनही त्यांची निश्चिती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निविदा प्रक्रिया प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने चौकशी करुन तातडीने कंत्राटदार निश्चित करून काम सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) मुंबईतील विविध रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामाकरिता दिनांक २५.११.२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण ५ निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्यानुसार शहर विभागातील कार्यसंकेतांक सी-३१० या निविदेसाठी लघुत्तम निविदाकार मे. रोडवेज सोल्युशन इंडिया इन्फ्रा. लि., पश्चिम उपनगरातील कार्यसंकेतांक डब्ल्यू-४१४, ४१५ व ४२१ या तीन निविदांसाठी अनुक्रमे मे. मेघा इंजिनिअरींग ॲण्ड इन्फ्रा. लि., मे. दिनेशचंद्र आर. अग्रवाल इन्फ्राकॉन प्रा.लि. व मे. एन.सी.सी. लिमिटेड व पूर्व उपनगरातील कार्यसंकेतांक ई-२८९ या निविदेसाठी मे. ईगल इन्फ्रा. इंडिया लि. यांना दिनांक १८.०१.२०२३ रोजी समतुल्य दराने कार्यादेश देण्यात आले आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१६) * ५६५३४ श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.यशोमती**

**ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.धनंजय मुंडे (परळी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती श्वेता महाले (चिखली), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.रविशेठ पाटील (पेण), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.शंकरराव गडाख (नेवासा), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वत्र अतिवृष्टी, महापुर, वादळी वारे, वीज पडून व ढगफुटीसदृश्य पाऊस यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली असून शेतकऱ्यांच्या जनावरांचे, पिकांचे, शेतीचे, फळबागांचे आणि स्थावर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बहुतांश जिल्ह्यात नुकसानग्रस्त विभागातील पंचनामेच झालेले नसून अनेक ठिकाणी पंचनाम्याच्या वस्तुनिष्ठ अहवालाचा अभाव व नुकसान झालेले असतानाही नुकसान न झाल्याचा विसंगत अहवाल देणे तसेच पिकांची आणेवारी ही ५० टक्क्यांपेक्षा कमी दर्शविल्यामुळे अनेक पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने नुकसान भरपाईसाठी तब्बल २७७ कोटी ५८ लाख रुपयांची मदत जाहीर व जिल्हा प्रशासनास हस्तांतर करुनही महसूल व कृषि विभागांतर्गत समन्वयाअभावी तसेच ऑनलाईन प्रणालीतील त्रुटी अशा अनेक कारणांमुळे आर्थिक मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून जाहिर करण्यात आलेली मदत नुकसानीच्या तुलनेत अत्यंत कमी असून लागवडीचा खर्च देखील त्यातून निघणार नसल्याने ही रक्कम वाढविण्याबाबत शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळणाऱ्या आपत्ती व्यवस्थापन निधीच्या निकषात बदल करुन हा निधी वाढविण्यासंदर्भात तसेच केंद्राकडे प्रलंबित असलेला निधी तात्काळ मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही,

(३) खरे नाही, चालू हंगामात अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या व शेतजमिनीच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरूपात रू.७०९३.१९ कोटी इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यापैकी रू. ४७५०.९३ कोटी इतका निधी संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्षात वितरीत

केला आहे. उर्वरित निधी केंद्रीभूत थेट लाभार्थी हस्तांतरण प्रणालीमार्फत (DBT) पात्र बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येत नाही. मात्र राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दराने व निकषानुसार निविष्ठा अनुदान स्वरूपात मदत देण्यात येते. चालू हंगामामध्ये शेतीपिकांच्या नुकसानीकरिता शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दुप्पट दराने २ हेक्टर ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.
(५) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे सुधारित निकष व दर केंद्र शासनाकडून प्राप्त झाले असून हे सुधारित दर व निकष राज्यात लागू करण्याची प्रक्रिया सुरू आहे.
(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड महानगरपालिकेतील गुंठेवारीच्या संचिकांमध्ये केलेला गैरव्यवहार

**(१७) * ५७७७१ श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिकेत गुंठेवारीच्या ६३८० संचिकेतील २ संचिकेवर बनावट स्वाक्षरीचे प्रमाणपत्र तसेच बनावट पावत्यांच्या आधारे गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वजिराबाद पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंद झाला असूनही तपास अद्याप अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या गुंठेवारी विभागात ६३८० संचिकांपैकी २ संचिकेत बनावट स्वाक्षरीचे प्रमाणपत्र तसेच बनावट पावत्यांच्या आधारे गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी निदर्शनास आले.
(२) सदर प्रकरणी दोन प्लॉटधारक, दोन परवानाधारक अभियंते व एक लिपिक यांच्याविरुध्द महानगरपालिकेच्या उप अभियंता मार्फत वजिराबाद पोलिस ठाणे येथे दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(४) गुंठेवारी प्रमाणपत्र संचिकेमधील पावत्यांची शहानिशा करण्यासाठी दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी महानगरपालिकेमध्ये समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीमार्फत संचिकेमधील पावत्यांची शहानिशा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील लोटे-परशुराम औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमधून सोडण्यात येणाऱ्या अतिविषारी रासायनिक द्रव्यांमुळे होत असलेले प्रदुषण

**(१८) * ५६६५८ श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील लोटे-परशुराम औद्योगिक वसाहतीतील काही कारखान्यांमधून अतिविषारी रासायनिक द्रव्ये सोडली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यांमधून सोडण्यात येणाऱ्या विषारी रसायनामुळे निर्माण होणाऱ्या विनाशकारी प्रदुषणामुळे परिसरातील मासेमारी आणि शेती व्यवसाय धोक्यात आला असून स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार करुनही दोषी कारखान्यांविरुद्ध प्रदुषण मंडळाकडून कोणतीच कारवाई केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने प्रदुषणास आळा घालण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.), रत्नागिरी यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार मासेमर्तुकीबाबतची कोणतीही तक्रार त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना विहित वेळेत वेतन व थकीत देयके प्रदान करण्याबाबत

**(१९) * ५६५६५ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.शिरीषकुमार नाईक**

**(नवापूर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना वेतनासाठी ४ वर्षे पूर्ण रक्कम व प्रत्येक महिन्याला ४ ते १० तारखेदरम्यान वेतन देण्याचे मा.न्यायालयात आश्वासन देऊनही कर्मचाऱ्यांचे वेतन न झाल्यामुळे ९० हजार कर्मचारी वेतनाविना असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र ट्रस्ट असून कर्मचाऱ्यांकडून भविष्य निर्वाह निधी व उपदान यासाठीचे एकूण ६५० कोटी रुपये कपात करुनही ट्रस्टकडे भरण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची पी एफ, ग्रॅच्युईटी, बँकेचे कर्ज व इतर मिळून जवळ जवळ १२०० कोटी रुपयांची रक्कम शासनाकडे थकित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्मचाऱ्यांना दिला जाणारा ३४ टक्के महागाई भत्तादेखील अद्यापही मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांची सर्व थकीत देयके व वेतन विहित वेळेत अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) व (३) होय.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे निधीची कमतरता असल्यामुळे माहे जानेवारी २०२३ अखेर रु.७८१.११ कोटी भविष्य निर्वाह निधी व उपदान ट्रस्टकडे जमा करणे प्रलंबित आहे.

रा.प.महामंडळाकडे निधी अभावी जानेवारी २०२३ अखेर एस.टी कर्मचाऱ्यांचे पीएफ, ग्रॅच्युईटी रु.७८१.११ कोटी, बॅकेचे कर्ज रु.११४.०० कोटी, व इतर मिळून सुमारे रु.३६८.०० कोटी असे एकुण रु.१२६३.११ कोटी देणी प्रलंबीत आहेत व निधीच्या उपलब्धेनुसार सदरची प्रलंबीत देणी अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) रा.प. कर्मचाऱ्यांना सुधारित ३४ टक्के दराप्रमाणे वाढील महागाई भत्ता माहे ऑक्टोबर २०२२ देय नोव्हेंबर २०२२ च्या वेतनापासुन लागू करण्यात आला आहे.

(५) व (६) निधीच्या उपलब्धतेनुसार एस.टी.कर्मचाऱ्यांची सर्व थकीत देयके अदा करण्याची कार्यवाही चालू आहे. रा.प.महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरीता शासनाकडून वेळोवेळी अर्थसहाय्य देवून वेतन अदा करण्यात येत आहे.

-----------------

**बीड जिल्ह्यात ऊसतोड कामगारांच्या पाल्यांकरिता असलेली हंगामी वसतिगृहे बंद असल्याबाबत**

**(२०) * ५७३९६ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत ऊसतोड मजुरांच्या पाल्यांचे स्थलांतर रोखून त्यांना अखंड, मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासाठी राज्य शासनामार्फत शालेय स्तरावर हंगामी वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील शिरूर कासार, धारूर, वडवणी आदी तालुक्यांमध्ये सदर वसतिगृहे सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात सुरूच झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाकडून हंगामी वसतीगृहांना दिले जाणारे अनुदान वाढवून त्यांना कायमस्वरूपी मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ही वसतिगृहे तात्काळ सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत बीड जिल्ह्यात २३७ हंगामी वसतिगृह सुरू असून २३१६४ इतके विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेत आहेत. २३७ हंगामी वसतिगृहामध्ये शिरूर-३, धारूर-८५ व वडवणी तालुक्यातील २३ हंगामी वसतिगृहाचा समावेश आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केंद्र शासनाने नाशिक महानगरपालिकेस दिलेल्या निधीचा यथायोग्य विनियोग न झाल्याबाबत**

**(२१) * ५७३३० श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील प्रदूषणकारी शहरामध्ये राज्यातील नाशिक शहराचा समावेश झाल्यानंतर केंद्र शासनाने एनकॅपअंतर्गत नाशिक महानगरपालिकेस रुपये ६५ कोटी रुपयांचा निधी दिला असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतून महानगरपालिकेने केलेल्या कामांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नोडल अधिकारी तसेच सल्लागार यांनी दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास पाहणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पाहणी दरम्यान महानगरपालिकेच्या अनेक योजना अद्याप कागदोपत्रीच असल्याचे केंद्रीय पथकास आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाने दिलेल्या निधीचा विनियोग कशाप्रकारे झाला याबाबत चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, भारतामध्ये एकूण १२२ Non-attainment Cities (राष्ट्रीय वातावरण वायु गुणवत्ता मानकापेक्षा खाली हवेची गुणवत्ता असलेल्या) शहरांपैकी महाराष्ट्रात १७ शहरे आहेत. त्यामध्ये नाशिक शहराचाही समावेश आहे.

राष्ट्रीय स्वच्छ वायु कार्यक्रमांतर्गत १५ व्या वित्त आयोगाकडून नाशिक महानगरपालिकेस एकूण ८७.०१ कोटी निधी प्राप्त झालेला आहे

(२) होय.

(३) व (४) हे खरे नाही.

- राष्ट्रीय स्वच्छ वायु कार्यक्रमांतर्गत प्राप्त निधीतून हवा प्रदूषण कमी करण्याच्या अनुषंगाने शहरात तीन विद्युत शवदाहिनी ची कामे प्रगतीपथावर आहेत.
- बांधकाम आणि पाडकामामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्यावरील प्रक्रिया करणारे संयंत्र उभारणे, सफाई करिता यांत्रिकी मशिन खरेदी करणे ही कामे कार्यादेश देण्याच्या टप्प्यावर आहेत.
- शहरात ईलेक्ट्रीक वाहन चार्जिंग स्टेशन्स उभारणे, सार्वजनिक वाहतुकीअंतर्गत २५ ईलेक्ट्रीक बसेस खरेदी करणे, सुलभ शौचालयांवर सोलार पॅनल बसविणे, कुंपण आणि बफर वृक्षारोपण, उद्यानांमध्ये कचरा कंपोस्टिंग प्लांट बसविणे, रस्ता दुभाजक तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजुस वृक्षारोपण करणे, व्हर्टिकल गार्डन्स उभारणे, जनजागृती करणे, इत्यादी कामे प्रशासकीय मंजुरीच्या प्रक्रियेत आहेत.
- वरीलप्रमाणे एकूण ६५.२० कोटींची कामे नाशिक महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेली आहेत.
- वरील कामांसह शहरातील हवेचे प्रदूषण कमी करण्याच्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेमार्फत सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दिंडोशी (मुंबई) क्षेत्रातील प्रभाग क्र.४१ मधील भूखंडावर रुग्णालय उभारण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत

**(२२) * ५६८०६ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दिंडोशी क्षेत्रातील प्रभाग क्र.४१ मधील न.भू.क्र.८२७ड/४, मौजे मालाड (पूर्व) येथील महापालिकेच्या भूखंडावर चिकित्सा केंद्र, एन.आय.सी.यु., लहान मुलांसाठी रुग्णालय, स्त्रियांसाठी प्रसुतीगृह यासह प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाना सुरु करण्यासंदर्भात महानगरपालिकेतर्फे ३६८६.०३ चौ.मी. क्षेत्राचा राखीव भूखंड सार्वजनिक आरोग्य खात्यास हस्तांतरीत करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंडावर ७५ खाटांचे प्रसुतीगृह तसेच एन.आय.सी.यु. उभारण्याकरिता महानगरपालिकेमार्फत वास्तुविशारद यांचेकडून व्यवहार्यतेबाबत टिप्पणी करण्याव्यतिरिक्त कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावास मंजुरी मिळूनही या रुग्णालयास अमर्याद विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालय तात्काळ सुरू करुन त्यास आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मौजे मालाड (पूर्व) येथील न.भू.क्र. ८२७ ड/४ हा २७४९ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा भूखंड विकास नियोजन आराखडा २०३४ नुसार “महानगरपालिका प्रसुतीगृह” याकरिता आरक्षित आहे. सदर भूखंड दिनांक ०७.१२.२०१२ रोजी ५% ॲमिनिटी ओपन स्पेस अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत झाला असून, सदर भूखंडाच्या मालमत्ता पत्रकावर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नाव दाखल करण्यात आले आहे.

(२) सदर भूखंडावर प्रसुतीगृहाकरिता महानगरपालिका वास्तुविशारद विभागाकडून व्यवहार्यता अहवाल प्राप्त करुन घेण्यात येत असून, सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मंजुरी व आराखड्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) हे खरे नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर भूखंडावरील प्रसुतीगृहाच्या प्रस्तावाचा आराखडा तयार करण्यात आल्यानंतर आवश्यक निधीबाबतची मागणी करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील मेट्रो खोदकामादरम्यान पिलर प्लेट पडून महिलेचा झालेला मृत्यु

**(२३) * ५७२८८ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील कॅडबरी जंक्शन जवळील विवियाना मॉलनजीक मेट्रो रेल्वेसाठी खोदण्यात आलेल्या खड्डयात कचरा वेचण्यासाठी उतरलेल्या सुनिता कांबळे या महिलेच्या अंगावर तेथील पिलरच्या सपोर्टसाठी लावलेली मेट्रो ब्रिजची प्लेट पडल्याने त्या महिलेचा जागीच मृत्यु झाल्याची दुर्घटना दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिलेचे पती काही वर्षांपूर्वीच मृत्यु पावल्यामुळे दोन मुलींच्या संगोपनाची व उदरनिर्वाहाची जबाबदारी सदर महिलेवर पडल्यामुळे महिला कचरा वेचण्याचे काम करीत असल्याचे निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, कुटुंबांचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलेचा अपघाती मृत्यु झाल्यामुळे या कुटुंबियांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी त्यांच्या नातेवाईकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर कुटुंबांतील दोन मुलींचे संगोपन व त्यांच्या पुढील भवितव्याकरिता आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ६.०० च्या सुमारास मेट्रो साईट मध्ये अनधिकृत व्यक्तींना प्रतिबंध असलेल्या ठिकाणी काही महिलांचा गट भंगार गोळा करण्याकरीता अनधिकृतपणे मेट्रो मार्ग-४ च्या कॅडबरी जंकशन स्थानकाचे काम सुरु असलेल्या ठिकाणी आला आणि या गटातील एका महिलेने अँटी क्रॅश बॅरियरच्या शटरला आधार देणारे शटर जॅक काढण्यास सुरुवात केली. जेव्हा शटरचे दोन्ही जॅक (Jack) महिलेकडून काढले गेले, तेव्हा शटर त्याच्या जागेवरून खाली सरकले व क्रॅश बॅरियरच्या खोदलेल्या खड्ड्यात उभ्या असलेल्या महिलेच्या अंगावर पडले. सदर महिलेला जखमी अवस्थेत सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे येथे दाखल करण्यात आले असता, त्यावेळी कार्यरत डॉक्टरानी तिला मृत घोषित केले.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी मयत महिलेच्या नातेवाईक /वारसदाराकडून आर्थिक मदत देण्याबाबत मागणी आलेली नाही. सदर मयत महिलेचे नातेवाईक / वारसदार यांनी मागणी केल्यास त्यासंदर्भात निर्णय घेणे शक्य होईल.

-----------------

**मौजा देव्हाडी (ता. तुमसर, जि.भंडारा) येथील क्लैरियन ड्रग्स या औषध निर्मिती कारखान्यातील रसायनामुळे जलप्रदूषण वाढल्याबाबत**

**(२४) * ६०३५१ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा देव्हाडी (ता तुमसर, जि.भंडारा) येथील क्लैरियन ड्रग्स या औषध निर्मिती कारखान्यातील रसायनयुक्त पाणी नाल्यात सोडल्याने जलप्रदूषणात वाढ होत असून मासे मृत्युमुखी पडत आहेत परिणामी नागरीकांचे व जनावरांचे आरोग्यही धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रसायनयुक्त पाण्यामुळे परिसरातील शेतात धान, हरभरा, गहू, व अन्य पिकांची लागवड करता येत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत संबंधीत ग्रामपंचायत प्रशासनाने कारखान्याच्या संचालकास कळवून देखील याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कंपनी तसेच संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रश्नाधीन परिसराची वेळोवेळी पाहणी करण्यात आली आहे.

भेटीदरम्यान आढळून आलेल्या त्रुटीबाबत क्लैरियन ड्रग्स या कारखान्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ११/०५/२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस, दिनांक २५/०८/२०२२ रोजी प्रस्तावित निर्देश तसेच दिनांक ०२/०२/२०२३ रोजी अंतरीम निर्देश बजावण्यात आले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १६/०२/२०२३ रोजी सदर उद्योगाच्या केलेल्या पाहणीदरम्यान सदर उद्योगाचे कोणत्याही प्रकारचे सांडपाणी नाल्यात जात असताना आढळून आलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये नालेसफाईची कामे दाखवून गैरव्यवहार सुरू असल्याबाबत

**(२५) * ५७५४९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये नालेसफाईच्या कामांमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार सुरू असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय, वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आणि मुख्य खात्याकडून फक्त कागदोपत्री नालेसफाईची कामे दाखवण्यात आली असून न झालेल्या कामांच्या बदल्यात कंत्राटदाराला देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) पुणे महानगरपालिका हद्दीत एकूण ४४३ नाले असून लांबी ६४५ कि.मी. इतकी आहे. पुणे महानगरपालिकेच्या मलनि:सारण देखभाल व दुरूस्ती विभागामार्फत क्षेत्रिय कार्यालय निहाय नाला साफसफाई विषयक निविदा काढण्यात आलेल्या असून नाले साफसफाई करण्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. यामध्ये एकूण ८६ क्रिटीकल ठिकाणे, ३४४ कल्व्हर्ट तसेच १६९.५८ कि.मी. लांबीच्या नाल्याची साफसफाई करण्यात आलेली आहे.

नाला साफसफाईच्या कामाचे मोजमाप नाला साफसफाई क्षेत्रफळ व गाळ काढणे घनमीटर परिमाणानुसार करण्यात येते. त्यानुसार ठेकेदारास बिल अदा करण्यात येते, त्यामुळे नाले सफाईच्या कामामध्ये कोणताही गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(२) सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यलय व वारजे क्षेत्रिय कार्यालयातील नाल्यांच्या साफसफाईसाठी प्रत्येकी ७५ लक्ष एवढी निविदा काढण्यात येवून दिनांक १०.०६.२०२२ पर्यंत सर्व नाल्यांची साफसफाई पूर्ण करण्यात आली आहे.

या साफसफाईचा आढावा महानगरपालिकेच्या वरिष्ठ पातळीच्या अधिकाऱ्यांमार्फत घेण्यात येते व झालेल्या कामाचे बील कंत्राटदारास अदा करण्यात येते. त्यामुळे न झालेल्या कामाच्या बदल्यात कंत्राटदाराला देयक देण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी नगरपालिकेने दिव्यांग व्यक्तीच्या अनुदानातून एक हजार रुपयांची केलेली कपात

**(२६) * ५७८२२ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी नगरपालिकेच्या वार्षिक उत्पन्नातून दिव्यांगाना वाटप करण्यात येणाऱ्या पाच टक्के निधीमधून प्रशासनाने कोरोनाचे कारण देऊन शहरातील दिव्यांग व्यक्तींच्या अनुदानातून एक हजार रुपयांची कपात केली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदानात कपात करुनही वेळेवर अनुदान मिळत नसल्याने संबंधित दिव्यांग लाभार्थ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे, दिव्यांग संघटनेने मुख्याधिकारी, परभणी नगरपालिका यांची भेट घेऊन वेळेवर अनुदान मिळावे तसेच अनुदानात कपात करण्यात येऊ नये अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिव्यांगांच्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

कोविड कालावधीमध्ये मालमत्ता कराची वसुली झाली नसल्याने दिव्यांग व्यक्तींना द्यावयाच्या अनुदानामध्ये एक हजार रुपयाची कपात करण्यात आली.

(२) हे खरे आहे.

(३) महानगरपालिकेच्या महसूली उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता प्राप्त होणाऱ्या महसूलाच्या किमान ५ टक्के राखीव निधी दिव्यांग कल्याणकारी योजनेकरीता खर्च करण्याच्या संदर्भात प्रति दिव्यांग रु.५०००/- मानधन स्वरुपात दिव्यांगाच्या खात्यावर वर्ग करण्यासाठी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या ठरावान्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार अनुदान वाटप करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील केईएम रुग्णालयात गरीब रुग्णांच्या उपचारासाठी असलेल्या निधीत झालेला गैरव्यवहार**

**(२७) * ५६६०४ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील केईएम रुग्णालयात उपचार आणि शस्त्रक्रियेसाठी दाखल होणाऱ्या गरीब रुग्णांसाठीच्या निधीचा श्रीमती सोनाली गायकवाड या महिला कर्मचाऱ्याने अपहार केला असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महिला कर्मचाऱ्याने सहअधिष्ठाता व उपअधिष्ठाता यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या खोट्या स्वाक्षऱ्या करून तसेच औषध विक्रेत्यांकडून बनावट देयके घेऊन ६१ लाख रुपयांचा गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी भोईवाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

मुंबईतील के.ई.एम. रुग्णालयातील रेडिओलॉजी विभागात कार्यरत महिला कंत्राटी कर्मचाऱ्याकडून गरीब रुग्ण धर्मादाय निधीमध्ये अनियमितता आढळून आल्यावर सदर कर्मचाऱ्याविरोधात भोईवाडा पोलीस ठाणे येथे दिनांक १२.०१.२०२३ रोजी प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) दाखल करण्यात आला आहे.

(४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून, विभागीय चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मंगळवेढा (जि.सोलापूर) नगरपालिका शाळेच्या इमारतीची झालेली दूरवस्था**

**(२८)** * **५७२२६ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) नगरपालिकेच्या शाळेची इमारत धोकादायक अवस्थेत असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेतील १०६२ विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा अभाव, आवारात पसरलेली दुर्गंधी, अद्ययावत क्रिडांगण नसणे तसेच शौचालयाची झालेली दुरवस्था इत्यादी समस्यांचा सामना करावा लागत असल्याने, विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पालकांनी स्थानिक प्रशासनाकडे वारंवार लक्ष घालण्याची मागणी करुनही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन नगरपालिका शाळेची धोकादायक इमारत दुरुस्ती व इतर समस्या तातडीने सोडवून याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, स्थानिक वर्तमानपत्रामध्ये दिनांक ११/१२/२०२२ रोजी या आशयाची बातमी प्रसिद्ध झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मंगळवेढा नगरपालिकेच्या शाळेची इमारत धोकादायक असल्याबाबत कोणत्याही पालकांची निवेदने स्थानिक प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाहीत. तथापि, याबाबत बळीराजा शेतकरी संघटना, मंगळवेढा आणि महाराष्ट्र राज्य प्रहार अपंग क्रांती आंदोलन, मंगळवेढा यांची डिसेंबर, २०२२ मध्ये निवेदने स्थानिक प्रशासनाकडे प्राप्त झाली आहेत.

मंगळवेढा नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळांकरीता शिक्षण मंडळ असून नगरपालिकेच्या एकूण ६ इमारतीमध्ये ८ शाळा आहेत. सदरच्या शाळेमधील एकूण पटसंख्या १०७२ इतकी आहे.

सदर शाळांची स्थानिक प्रशासनाकडून स्थळ पाहणी करण्यात आली असून ६ इमारतीपैकी इमारत क्रमांक २, ३, ४ व ६ सुस्थितीत असून तेथे पिण्याच्या पाण्याची, स्वच्छता गृहाची, क्रिडांगणाची सुविधा उपलब्ध आहे. सदर शाळांच्या आवारामध्ये दुर्गंधी दिसून आलेली नाही.

इमारत क्रमांक १ मध्ये शौचालयाची व्यवस्था नाही. दरम्यान सदरचे काम नगरपरिषदेच्या स्वनिधीमधून करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे. त्याचबरोबर सदर शाळेच्या इमारतीमध्ये संरक्षण भिंत बांधण्याचे काम दिनांक ५/८/२०२२ रोजी तसेच क्रिडांगण दुरुस्तीचे काम सन २०२१ मध्ये पूर्ण केले आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नगरपरिषदेने नळ कनेक्शन देऊन उपलब्ध करुन दिली आहे.

इमारत क्रमांक ५ चे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून इमारतीचे अद्यावतीकरण करण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून दिनांक २७/१२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ५० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यानुसार नगरपरिषदेने त्याबाबतच्या कामांच्या अंदाजपत्रकास दिनांक १/२/२०२३ रोजी मान्यता घेतली असून प्रशासकीय मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

याव्यतिरिक्त नगरपरिषदेने इमारत क्रमांक ५ साठी भिंत, दरवाजे, खिडक्या इत्यादीची किरकोळ दुरुस्ती तसेच रंगकाम, सार्वजनिक कार्यक्रमासाठी व्यासपीठाची दुरुस्ती इत्यादी कामे सन २०२२ मध्ये केली आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका नाही, अशी वस्तुस्थिती आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा येथील डपिंग ग्राऊंड बंद करण्याबाबत**

**(२९) * ५७७५४ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दिवा येथे सुरु असलेले डंपिंग ग्राऊंड कायमस्वरूपी बंद करण्याबाबत स्थानिक नागरिक अनेक वर्षापासून मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या डंपिंगची क्षमता संपलेली असतानाही दररोज येथे ३ ते ४ टन कचरा टाकला जात असून सतत आगी लागण्याच्या घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डंपिंग ग्राऊंड तसेच तेथील आगींमुळे होणारे प्रदूषण व त्यामुळे येणाऱ्या आजारपणामुळे नागरिक त्रस्त असून स्थानिक नागरिकांनी डंपिंग ग्राऊंडकडे येणाऱ्या गाड्या अडवून निषेध व्यक्त केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू डंपिंग ग्राऊंड कायमस्वरूपी बंद करण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) ठाणे महानगरपालिका क्षेत्रात प्रतिदिन अंदाजित १०६० मे.टन घनकचरा निर्माण होत असून घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम, २०१६ नुसार दिवा येथील डंपिंग ग्राऊंडवर घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, दिवा डंपिंग ग्राऊंडसाठी स्थानिक नागरिकांचा विरोध, सदर जागेची संपलेली क्षमता या कारणामुळे उक्त डंपिंग ग्राऊंडवर टाकण्यात येणारा कचरा टप्प्या-टप्प्याने कमी करुन दिनांक ३१.०१.२०२३ पासून दिवा क्षेपणभूमी पुर्णपणे बंद करण्यात आली आहे.

दरम्यान याठिकाणी असलेल्या कचऱ्यास लागणाऱ्या आगीवर वेळोवेळी स्थानिक अग्निशमन विभागामार्फत नियंत्रण ठेवण्यात येत असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा व नाशिक जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील कार्बन उत्सर्जित करणाऱ्या कंपन्यांमुळे शेतीचे होत असलेले नुकसान**

**(३०) * ५७६६६ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा व नाशिक जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील कंपन्या मोठ्या प्रमाणात कार्बन उत्सर्जित करीत असल्याने शेतातील पिकांवर काजळी पडून पिके खराब होत असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आला असून सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्यही धोक्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यांच्या चिमण्यांची उंची, कारखान्याने वापरलेल्या पाण्याचे रिसायकलिंग तसेच सांडपाण्यावर प्रक्रिया न करणे आदी गोष्टींसंदर्भात प्रदूषण मंडळाने कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसीत शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन कारखाने प्रदूषण करीत असतानाही प्रदूषण मंडळाचे झालेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खर नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार माहे जानेवारी २०२३ दरम्यान या संदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे कळविले आहे.

(२) व (३) हे खरे नाही,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे संबंधित उद्योगांना भेटी दिल्या जातात व दोषी उद्योजकांवर कारवाई केली जाते.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड प्रशासनाने केलेली करवाढ रद्द करण्याबाबत**

**(३१) * ५९६१४ श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड प्रशासनाकडून आगामी तीन वर्षांसाठी वार्षिक कर आकारणीची पुनर्रचना करण्यात येऊन त्याअन्वये वाढीव करवाढ करण्यात आली असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन घर बांधकामास तसेच घर दुरुस्तीसाठी रेड झोनच्या नावाने देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाकडून परवानगी मिळत नसून त्याअनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभही मिळत नसताना ही वाढीव कर आकारणी नागरिकांवर आर्थिकदृष्ट्या अन्यायकारक ठरणारी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढीव कर आकारणी रद्द करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिक व संघटनांमार्फत कन्टोन्मेंट बोर्ड प्रशासनाकडे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाढीव करवाढ रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
कॅन्टोन्मेंट कायदा २००६ कलम ७३-बी अन्वये मिळकतीच्या क्षेत्रानुसार कर आकारणी करण्यात येते.
(३) होय, हे खरे आहे.
(४) कॅन्टोन्मेंट कायदा २००६ कलम ७६ व ७७ नुसार वाढीव करवाढ रद्द करण्याबाबत सुनावणीनंतर निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील धरमतर खाडीत सोडण्यात येणाऱ्या रसायन मिश्रित पाण्यामुळे होत असलेले प्रदूषण

**(३२) * ५७२२२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील डोलवी येथे धरमतर खाडीच्या बाजूला जेएसडब्ल्यू कंपनी तसेच अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथे पी.एन.पी. कंपनी या दोन्ही प्रकल्पामार्फत धरमतर खाडीत सोडण्यात येणाऱ्या रसायनमिश्रित व दुषित पाण्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपन्या सुरू झाल्यापासून खाडी परिसरातील प्रदुषणामुळे मच्छिमार बांधवांचा पारंपारिक मच्छिमारी व्यवसाय धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मच्छिमारांच्या समस्यांबाबत अभ्यास करण्यासाठी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्त्यव्यवसाय विभागाने वरिष्ठ वैज्ञानिक तथा वैज्ञानिक कारभार प्रमुख, केंद्रिय सागरी मस्त्यकी संशोधन संस्था (CMFRI) मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समिती गठीत होऊन बराच कालावधी होवूनसुध्दा कोणतीच कार्यवाही न झाल्यामुळे मच्छिमार बांधवांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून धरमतर खाडी प्रदुषित करणाऱ्या जेएसडब्ल्यू व पी.एन.पी. कंपन्यांवर कोणती ठोस कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) धरमतर खाडीतील मच्छिमारांच्या समस्या तसेच सागरी किनारपट्टीवरील प्रदूषणामुळे मत्स्योत्पादनावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करण्यासाठी कृषी, पदुम विभागाच्या दिनांक २७/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली असून दिनांक २१/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर समितीमधील सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) व (५) धरमतर खाडीतील मच्छिमारांच्या समस्या तसेच सागरी किनारपट्टीवरील प्रदूषणामुळे मत्स्योत्पादनावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करण्यासाठी कृषी, पदुम विभागाच्या दिनांक २७/१२/२०१८ व दिनांक २१/०२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या कामांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत**

**(३३) * ५६६७९ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे १२ हजार कोटी रुपयांच्या विविध ७३ कामांमध्ये झालेल्या कथित गैरव्यवहाराची चौकशी भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षकांमार्फत (कॅग) करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाकाळात ''राज्यात सन १८९७ चा साथरोग अधिनियम लागू करण्यात आला'' असल्यामुळे करोना नियंत्रणासाठी विविध उपाययोजना करतांना साथरोग कायद्यांतर्गत झालेल्या खर्चाची चौकशी केली जाऊ शकत नाही, अशी भूमिका घेत मुंबई महानगरपालिका प्रशासनाने खर्चाचा तसेच खरेदीचा तपशील देण्यास 'कॅग' ला नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने याप्रकरणी महाधिवक्त्यांचे अभिप्राय मागवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाधिवक्त्यांचे अभिप्राय शासनास प्राप्त झाले आहेत काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१ ) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे,

(४) महाधिवक्त्यांचे अभिप्राय अद्याप अप्राप्त असून त्याकरिता पाठपुरावा चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील कोस्टल रोडच्या बांधकामाबाबत**

**(३४) * ५६७७८ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेकडून बांधण्यात येत असलेल्या कोस्टल रोडच्या प्रकल्पांतर्गत काही बदल करून दोन खांबांतील अंतर ६० मीटर ऐवजी १२० मीटर करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाढलेल्या अंतरामुळे प्रकल्पाचा खर्च वाढून प्रकल्प पुर्ण होण्यास विलंब होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन खांबांतील वाढलेल्या अंतरामुळे पुर्वी प्रस्तावित असलेल्या ३.५ मीटरच्या मोनो पायलिंग ऐवजी कोणते तंत्रज्ञान वा कोणत्या विशिष्ट मटेरीयलचा वापर करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, संबंधित ठेकेदाराने यासाठी "कोवी" या युरोपीयन सल्लागार कंपनीशी संपर्क साधला असला तरी या कंपनीचा कामाचा व्याप पाहता कोस्टल रोडसाठी सल्ला मिळणे दुरापास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबईतील कोस्टल रोडच्या बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकल्पातील बदलांमुळे अतिरिक्त खर्च व प्रकल्प पूर्ण करण्यास अतिरिक्त वेळ लागण्याची शक्यता आहे.

१२० मीटरच्या पुलाचा भाग वगळता सदर प्रकल्पाचे इतर काम विहित वेळेत पूर्ण करावयाचे आहे. त्याचप्रमाणे अतिरिक्त काम कमीत कमी खर्च व वेळेत पूर्ण करण्याचा मानस आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) सदर प्रकरणी कंत्राटदाराने दिलेल्या प्रस्तावाची छाननी कंत्राटातील अटी व शर्तींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागारांकडून करण्यात येणार आहे. सल्लागारांच्या छाननी व पडताळणीनंतर त्यांच्या सल्ल्यानुसार योग्य ते तंत्रज्ञान वापरण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) सदर कंत्राट आराखडा व बांधणी या तत्वावर आधारीत असल्याने कंत्राटदार कंत्राटातील अटीनुसार सल्लागार नेमू शकतो.

कंत्राटदाराने प्रस्तावित केलेल्या प्रस्तावाची छाननी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागारांमार्फत करण्यात येत असून, नियुक्त कंत्राटदारांना मुंबई किनारी रस्त्याचे बांधकामातील बदलांसह कमीत कमी अतिरिक्त खर्च व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

### मुंबईतील हवेच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यासाठी अधिक केंद्रे स्थापित करण्याबाबत

**(३५) * ५७२१५ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत हवेची गुणवत्ता सातत्याने दुषित होत असल्यामुळे गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यासाठी मुंबईतील सध्या अस्तित्वात असलेली २५ केंद्र पुरेशी नसून तज्ञांच्या मते अधिक केंद्रांची आवश्यकता असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयात केलेल्या केंद्राच्या किंमती पेक्षा स्टार्टअप्सद्वारे जवळपास ३० पट स्वस्त आवृत्त्या स्वदेशी पद्धतीने बनवल्या असून ज्या तितक्याच अत्याधुनिक असून सुमारे ६ लाख रुपये किंमतीच्या असल्याचा अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाकडे प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा निर्णय घेण्यात आले आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार मुंबईतील हवेचे प्रदूषण कमी करण्याकरिता व हवेची गुणवत्ता सुधारण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मुंबई शहरातील हवेची गुणवत्ता तपासणीसाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन व त्या त्या ठिकाणांच्या भौगोलिक परिस्थितीचे निरीक्षण करुन हवा तपासणी केंद्रे मुंबईत १४ ठिकाणी उभारलेली आहेत. सदर यंत्रणेमधून प्राप्त होणारी आकडेवारी मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशित केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) यासाठीचा कृती आराखडा बनवण्यात आला असून त्याची अंमलबजावणीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येत असुन, कृती आराखडयाची कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील नालेसफाईकरिता महानगरपालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेत दिरंगाई होत असल्याबाबत

**(३६) * ५६५७७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नालेसफाईकरिता मुंबई महानगरपालिकेने माहे डिसेंबर मध्ये नालेसफाईसाठी निविदा मागविल्या असल्यातरी सदर निविदा प्रक्रियेला अद्याप सुरुवात झाली नसल्याने, नालेसफाईची कामे उशीरा सुरु होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील नालेसफाईची कामे अनेकदा प्रलंबित राहिल्याने आणि ऐन पावसाळयातही नालेसफाई करावी लागत असल्याने मुसळधार पाऊस किंवा अतिवृष्टी झाल्याने पुराचा धोका निर्माण होऊन मुंबईकरांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे बहुतांशी वेळा निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर्षी नाल्यातील गाळ काढण्याच्या कामांना माहे मार्च मध्येच सुरुवात करण्याचे मुंबई महानगरपालिकेचे लक्ष असले तरी निविदा प्रक्रिया प्रलंबित राहिल्याने पावसाळ्यापुर्वी कामेही प्रलंबित राहण्याची स्थिती निर्माण होण्याची शक्यता समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईत मागील अनेक वर्षांपासून अतिवृष्टीमुळे निर्माण होणाऱ्या पुरस्थितीचा सामना करण्यासाठी मुंबईतील नालेसफाई वेळेवर करण्यासाठी तसेच दरवर्षी होणाऱ्या पुरस्थितीवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबईतील शहर, पूर्व व पश्चिम विभागातील मोठे व छोटे नाले तसेच पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गावरील विविध छोटे/मोठे नाले, पेटीका नाले तसेच रस्त्यालगतच्या पर्जन्य जलवाहिन्या व मिठी नदीमधील गाळ काढण्याच्या कामांकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण ३१ निविदा मागविण्यात आल्या असून, सदर निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबईतील नालेसफाईची पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे नियमितपणे पावसाळ्यापूर्वी करण्यात येतात. तथापि, नाल्याचा प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक असलेली नालेसफाईची किरकोळ स्वरुपाची कामे पावसाळ्यात करण्यात येतात.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सन २०२२ च्या पावसाळ्यात पुरस्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाईच्या कामांकरिता निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, सदर कामे मार्च, २०२३ च्या पहिल्या आठवडयात सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे नियोजित आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आल्याबाबत

**(३७) * ५६५४२ श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अजित पवार (बारामती), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी (जि.नाशिक) नदीतील पाणी स्नानासाठी योग्य नसल्याबाबत मा.हरित लवादाने नाशिक महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेने ५० कोटी रुपये खर्च करुन बांधलेल्या गंगापूर मल:जलशुध्दीकरण (एसटीपी) प्रकल्पाचे सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून अनेक नागरिक येत असून त्याकरिता कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करुनही गोदावरी नदीतील अशुध्द पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित कंपन्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच नाशिक येथून वाहणाऱ्या गोदावरी नदीला चांदोरी, सायखेडा, करंजगाव (ता.निफाड, जि.नाशिक) या परिसरात मोठ्या प्रमाणात वाढलेल्या जलपर्णी नष्ट करण्यासाठी जेएसटी तंत्रांचा वापर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०२२ वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने यासर्व प्रकरणी सखोल चौकशी करुन नदीच्या पाण्याचे शुध्दीकरण करुन संबंधित कंपन्या व प्रशासनावर कारवाई करणेबाबत तसेच जलपर्णी नष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मा.हरित लवादाने त्र्यंबक नगरपरिषद यांचेशी संबंधित केस नं.५४४/२०१९ मध्ये याबाबत निर्देश दिले आहेत.

(२) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेने गंगापुर येथे मलजल शुध्दीकरण केंद्र सन २०१९ मध्ये कार्यान्वित केले आहे. येथे सांडपाण्यावर प्रक्रिया केलेले पाणी नदीपात्रात सोडण्यात येते. याबाबत दैनंदिन पाण्याचे नमुने तपासले जातात. तसेच, दिनांक १७/०१/२०२३ रोजी सुध्दा गंगापुर एसटीपी सुस्थितीत सुरु होता.

(३) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेने मलनि:स्सारण योजने अंतर्गत ०६ ठिकाणी एकूण ३९२.५० एमएलडी क्षमतेचे मलजल शुध्दीकरण केंद्र उभारलेले असून त्यात सांडपाण्यावर प्रक्रिया करुनच पाणी नदीत सोडण्यात येते. त्यापैकी ०४ मलजल शुध्दीकरण केंद्र सन २००३ ते २०१५ दरम्यान त्यावेळेस लागू असलेल्या मापदंडानुसार बांधण्यात आले आहेत. नवीन मापदंडानुसार त्यात सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनास पाठविण्यात आलेला आहे.

(४), (५) व (६) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात गोदावरी नदीपात्रात वाढलेल्या पाणवेली ट्रॅश स्किमर यंत्राने वेळोवेळी काढण्यात येत आहेत. तसेच, जेएसटी तंत्राच्या वापराबाबत महानगरपालिकेकडे मागणी प्राप्त झालेली नाही.

तसेच, नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील सातपुर व अंबड एमआयडीसी भागातील कंपन्यांवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेमार्फत कारवाई केली जाते.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विद्यार्थ्यांना नवीन परिक्षा पध्दत लागू करण्याचा घेतलेला निर्णय

**(३८) * ५६५७१ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय लोकसेवा आयोगाप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षा पध्दतीची पुर्नरचना करुन मुख्य परिक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपात न घेता वर्णनात्मक स्वरुपात घेण्याचा निर्णय शासनाने घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणताही वेळ न देता या नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी २०२३ पासून लागू करण्याचादेखील निर्णय घेण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जुन्या अभ्यासक्रमानुसार तयारी केलेल्या विद्यार्थ्यांसाठी या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी ही अडचणीची व अन्यायकारक ठरणार असून हजारो विद्यार्थ्यांचे यात मोठे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आयोगाच्या नव्या परिक्षा पध्दतीच्या तात्काळ अंमलबजावणी विरोधात राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात ठिय्या आंदोलने व निदर्शने देखील करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नवीन परिक्षा पध्दती लागू करण्यापूर्वी परिक्षार्थींना उचित कालावधी मिळावा यासाठी या निर्णयाची अंमलबजावणी सन २०२५ या वर्षापासून लागू करण्याची मागणीदेखील विद्यार्थ्यांनी केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

सन २०२३ पासून राज्य सेवा परीक्षा मुख्य वर्णनात्मक स्वरुपात घेण्याचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतला असून सदर निर्णय दि.२४ जून, २०२२ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) महाराष्ट्र लोकसेवा आयोग सांविधानिक दृष्ट्या स्वायत्त संस्था असून आयोगामार्फत परीक्षा प्रक्रिया राबविण्याबाबत धोरण ठरविले जाते. त्यामध्ये शासन स्तरावरुन कोणताही हस्तक्षेप करण्यात येत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत**

**(३९) * ५७४३९ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर येथील इंदूमिल येथे उभारण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम मागील ६ महिन्यांपासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्मारकाच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी सनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली होती मात्र ही समिती बरखास्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मारक स्थळी बसविण्यात येणाऱ्या पुतळ्याची प्रतिकृती अंतिम करणे व अन्य सर्वच प्रक्रिया देखील ६ महिन्यांपासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिडको, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडांवर भूमाफियांनी कब्जा केल्याबाबत

**(४०) * ५६७३८ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडको, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महानगरपालिकेच्या मालकीच्या कोट्यवधी रुपये किंमतीच्या भूखंडांवर भूमाफीयांनी कब्जा केला असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, नवी मुंबई येथील ऐरोली सेक्टर १० मधील महानगरपालिकेचा जलकुंभ ते ऐरोली पुलापर्यंतच्या रस्त्यावरील एका मोठ्या भूखंडावर भूमाफीयांनी अतिक्रमण केले असून, येथील झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल होत असून महानगरपालिकेच्या जलकुंभातून पाण्याची चोरी व वीज चोरीही केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तक्रार देऊनही अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) सिडकोने दि.१४.०२.२०२३ रोजी केलेल्या स्थळपाहणी दरम्यान नवी मुंबई येथील ऐरोली, सेक्टर-११ मधील भुखंड क्र.१ येथे जलकुंभाच्या (ESR / GSR) पाठीमागे मुलुंड ऐरोली हायवेच्या बाजुला मंडप डेकोरेशनचे साहित्य ठेवण्याचे गोडाऊन व ११ झोपड्या असे तात्पुरत्या स्वरुपातील अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, झाडांची कत्तल तसेच महानगरपालिकेच्या जलकुंभातून पाण्याची चोरी व वीज चोरी केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

सिडको, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महानगरपालिकेकडून महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत अनधिकृत बांधकामांबाबत नोटीस देऊन पोलिस बंदोबस्तात निष्कासन मोहिम राबविण्यात येते.
(३) व (४) सदर अनधिकृत बांधकाम काढून टाकण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमांतर्गत सिडकोमार्फत नोटीस देण्यात आली आहे .
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या ४०० कि.मी. रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाच्या निविदेत झालेला गैरव्यवहार

**(४१) * ५६८९१ श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.विनोद निकोले (डहाणू), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने ४०० कि.मी. रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणासाठी ५ हजार कोटी रुपयांच्या निविदा जाहीर केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निविदा प्रक्रियेत दुरुस्तीच्या कामासाठी रक्कम वाढवून आता ६ हजार ८० कोटी रुपयांच्या निविदा नव्याने काढण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निविदा प्रक्रियेमधून ठेकेदारांचा ४८% चा फायदा शासनाने करून दिल्याची बाब निदर्शनास आली असून, या निविदेवर प्रति कि.मी. किती खर्च केला वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, मुंबईत रस्ते काम करण्याचा योग्य काळ दिनांक १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर असताना निविदांची प्रक्रिया पूर्ण होऊन ऐन पावसाळ्यात रस्ते खोदण्यात येतील अशी तक्रार नागरीकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरच्या रस्ते कॉंक्रीटीकरणाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन रस्ते कॉंक्रीटीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मुंबईतील ३९७ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणासाठी सन २०१८ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रके तयार करुन दिनांक ०३.०८.२०२२ रोजी एकूण ५ निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि सदर निविदांच्या अंदाजपत्रकात अंतर्भूत केलेले दर सन २०१८ च्या दरसूचीनुसार असल्यामुळे तसेच केंद्र शासनाने जीएसटी दरात वाढ केल्यामुळे, सदर निविदांना अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकात अंतर्भूत केलेल्या बाबीचे प्रचलित बाजार भावानुसार सदर दरांचे पुनर्मुल्यांकन करण्यात आले. तसेच जीएसटी दरात चढ उतार होत असल्यामुळे जीएसटी वगळून कामात अंतर्भूत केलेल्या बाबींचे सुधारीत दर तयार करुन दिनांक २५.११.२०२२ रोजी पुन्हा निविदा मागविण्यात आल्या.

विविध निविदेत केलेल्या बाबी व कामांचे स्वरुप हे रस्तानिहाय बदलत असल्याने निविदेत अंतर्भूत केलेल्या बाबींनुसार कामांचा सरासरी दर १५.३१ कोटी प्रतिकिमी आहे.

(४) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार रस्त्यांची सुधारणा करण्याकरिता माहे ऑक्टोबर ते माहे मे अखेरपर्यंत कामे करण्यात येतात. अपूर्णावस्थेत असलेली कामे पावसाळा कालावधीत बंद करुन पावसाळ्यानंतर पुन्हा सुरु करण्यात येतात. पावसाळा कालावधीत कोणतेही रस्ते खोदण्यात येत नाहीत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) मुंबईतील रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामाकरिता दिनांक ०३.०८.२०२२ रोजी मागविण्यात आलेल्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्यामुळे सध्याच्या बाजारभावाप्रमाणे दरसुचीनुसार अंदाजपत्रके तयार करुन दिनांक २५.११.२०२२ रोजी नव्याने निविदा मागविण्यात आल्या. तद्नंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन संबंधित ठेकेदारांना दिनांक १८.०१.२०२३ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) तालुक्यातून प्रवाहित होणाऱ्या वरोली नदीपात्रात रासायनिक द्रव पदार्थ सोडल्यामुळे नदीचे पाणी प्रदुषित झाल्याबाबत

**(४२) * ५६७४० श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यातून गुजरात राज्याकडे प्रवाहित होणाऱ्या वरोली नदीपात्रात रासायनिक द्रव पदार्थ सोडल्यामुळे नदी प्रदूषित होऊन वडवली गावहद्दीत हजारो मासे व अन्य जलचर मृतावस्थेत आढळल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नदीच्या पाण्यावर पाणीपुरवठा योजना कार्यान्वित असल्याने नागरिकांच्या जीवाला धोका उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सदर प्रदुषण दूर करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) प्रश्नाधीन विषयाबाबत ग्रुप ग्रामपंचायत, वडवली–सवणे यांनी तहसिलदार, तलासरी, पालघर यांना दिलेले निवेदन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाले होते.

(२) हे खरे नाही.

वरोली नदी काठावर गावच्या रहिवाश्यांसाठी शासनाद्वारे वासा पाणी पुरवठा योजना कार्यान्वित असून वरोली नदीचे पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वरीष्ठ पोलिस निरीक्षक, तलासरी पोलिस ठाणे यांना दिनांक २४/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करून दोषी व्यक्ती विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत गट विकास अधिकारी, तलासरी पंचायत समिती, ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, वडवली-सवणे आणि सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, वडवली-सवणे यांना दिनांक १६/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये संबंधित नाल्यावर राष्ट्रीय राजमार्गाच्या दोन्ही बाजूस नाल्यामध्ये टाकाऊ रासायनिक द्रव्य पदार्थ न टाकणे या संबंधी खबरदारी बाबतचे सूचना फलक लावण्याचे आणि आरोपी सापडेपर्यंत सदर ठिकाणी चोवीस तास निगरानी करण्यासाठी कॅमेरा बसविण्याचे सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.